दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

● शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६

# एनसीसी छात्र किल्ले मुडागड अभ्यास मोहिमेत सहभागी

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद कॉलेजमधील एन.सी.सी विभाग, सह्याद्री प्रतिष्ठान, कोल्हापूर व ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन यांच्या संयुक्त विद्यमाने किल्ले मुडागड अभ्यास मोहीम आयोजित केली होती. या मोहिमेत विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**● इतिहास अभ्यासक मानसिंग चव्हाण यांनी केले मार्गदर्शन**

सह्याद्रीच्या पश्चिमेकडील दुर्गम रांगेत, घनदाट अरण्याच्या कुशीत वसलेला 'किल्ले मुडागड' आहे. यात इतिहास अभ्यासक मानसिंग चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. वनदुर्ग व टेहळणीचा किल्ला आणि ऐतिहासिक 'काजिर्डा घाटाच्या' सुरक्षेसाठी उभारलेल्या किल्ल्याचा ऐतिहासिक आढावा आणि भौगोलिक रचना समजून घेण्यासोबतच, शाहू महाराजांनी हत्तींसाठी राखीव ठेवलेल्या 'शिवारण्य' जंगलाची समृद्ध माहिती उपस्थितांना सांगितली. दुर्गसंवर्धन काळाची गरज, सह्याद्री का जपायचा यासह अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. 'किल्ले मुडागड अभ्यास मोहीम' मध्ये सहभागी असलेल्या विद्यार्थिनींनी इतिहास, निसर्ग याची दिलेल्या माहितीबद्दल समाधान व्यक्त करून आनंदाने मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली. पडसाळी गावातील दिलीप तुकाराम सावंत यांनी स्थानिक वाटाड्या म्हणून चांगले सहकार्य केले. भटकंतीचे नियोजन सह्याद्री प्रतिष्ठान, कोल्हापूर यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या एनसीसीच्या विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या मोहिमेसाठी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, नम्रता नरेवाडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.